महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : ४० वा दिनांक : ३०/१०/२०२४ वार : बुधवार

## शरद पवारांच्या राष्ट्रवादीची पाचवी यादी जाहीर

**मुंबई** : शरद पवारांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने आपली ५ उमेदवारांची पाचवी यादी जाहिर केली आहे. त्यात माढा विधानसभा मतदारसंघातून अभिजीत पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर पंढरपूर येथून अनिल सावंत यांना संधी देण्यात आली आहे.

२८८ सदस्यीय महाराष्ट्र विधानसभेसाठी येत्या २० नोव्हेंबर रोजी निवडणूक होणार आहे. तर २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. त्यासाठी आज उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने मंगळवारी सकाळी आपल्या ५ उमेदवारांची पाचवी यादी जाहीर केली.

शरद पवारांच्या पक्षाने माढा विधानसभा मतदारसंघातून अभिजीत पाटील यांना उमेदवारी दिली आहे. तर मुलुंड विधानसभा मतदारसंघातून संगीता वाझे यांना मैदानात उतरवले आहे. याशिवाय मोर्शी येथून गिरीश कराळे, पंढरपूर येथून अनिल सावंत तर मोहोळ येथून राजू खरे यांना संधी दिली आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे पंढरपूरच्या जागेवरून महाविकास आघाडीत गत आठवडाभरापासून रणकंदन सुरू होते. त्यात शरद पवार गटाकडून जवळपास डझनभर इच्छुक उमेदवार होते. त्यापैकी कुणाला संधी मिळणार? याविषयी तर्कवितर्क लढवले जात असतानाच काँग्रेसने येथून भगीरथ भालके यांना उमेदवारी देऊन शरद पवार गटाला झटका दिला. त्यानंतर आज शरद पवार गटाने येथून अनिल सावंत उमेदवारी दिली. त्यामुळे येथे महाविकास आघाडीच्याच दोन मित्र पक्षांत तगडा सामना होण्याची शक्यता आहे.

शरद पवार गटाने माढा विधानसभा मतदारसंघात अभिजीत पाटील यांना उमेदवारी दिली आहे. येथील अजित पवार गटाचे विद्यमान आमदार बबन शिंदे हे शरद पवार गटाकडून निवडणूक लढण्यास इच्छुक होते. यासाठी त्यांनी पवारांची भेटी घेतली होती. पण पवारांनी त्यांना स्पष्ट शब्दांत नकार दिला होता. यामुळे त्यांचा भ्रमनिरास झाला होता. अखेर शरद पवारांनी विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांच्यावर विश्वास दाखवत त्यांच्या हातात आपल्या पक्षाची तुतारी हे निवडणूक चिन्ह सोपवले.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाने २४ ऑक्टोबर रोजी आपल्या ४५ उमेदवारांच्या नावांची घोषणा केली होती. त्यानंतर दोन दिवसांनी म्हणजे २६ ऑक्टोबर रोजी पक्षाने आणखी २२ उमेदवारांच्या नावांची घोषणा केली. त्यानंतर २७ ऑक्टोबर रोजी ९, तर २८ ऑक्टोबर रोजी ७ आणि आज २९ ऑक्टोबर रोजी पक्षाने आणखी ५ उमेदवारांच्या नावांची घोषणा केली. यामुळे शरद पवार गटाच्या घोषित उमेदवारांचा आकडा ८८ वर पोहोचला आहे.

## अजित पवारांनी बिनकामी माझे सरकार पाडले - पृथ्वीराज चव्हाण



**मुंबई** : सिंचन घोटाळा अजित पवारांची पाठ सोडत नाही, अशी मिश्किल टिप्पणी माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केली. माझ्या कार्यकाळात कधीही ७० हजार कोटींचा घोटाळा झाला नाही. माझ्या कार्यकाळात सिंचन खात्याला सिंचनाची श्वेतपत्रिका काढण्याचा आदेश देताना ७० हजार कोटींचा घोटाळा शब्द वापरला नव्हता, असेही ते म्हणाले. अजित पवारांनी माझे सरकार पाडले, असा दावाही पृथ्वीराज चव्हाण यांनी केला.

अजित पवार यांनी भाजपने आरोप केलेल्या सिंचन घोटाळ्याच्या चौकशीचे खापर तत्कालीन गृहमंत्री स्व. आर. आर. पाटील यांच्यावर फोडले आहे. त्यावेळी माझ्यावर झालेल्या आरोपाच्या चौकशीच्या फाईलवर आर. आर. आबांनी सही केली, असे अजित पवार यांनी म्हटले. त्यांच्या विधानावर राजकीय वर्तुळातून विविध प्रतिक्रिया येत आहेत.

पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, सिंचन घोटाळा अजित पवारांची पाठ सोडत नाही. माझ्या कार्यकाळात कधीही ७० हजार कोटींचा घोटाळा झाला नाही. मी सिंचनाची श्वेतपत्रिका काढण्याचा आदेश सिंचन खात्याला दिला होता, तेव्हा मी माझ्या कार्यकाळात कधीही ७० हजार कोटीचा घोटाळा शब्द वापरला नव्हता. ती फाईल माझ्याकडे आली नाही. त्या फाईलवर माझी कुठलीही सही नाही. त्यामुळे सिंचन घोटाळा प्रकरणात मी चौकशी लावली नव्हती. नाहक माझा बळी घेतला. अजित पवारांनी २०१४ ला माझे सरकार पाडले आणि भाजपच्या राजवटीची मुहूर्तमेढ केली, असे त्यांनी 'टीव्ही ९ मराठी'शी बोलताना सांगितले.

पृथ्वीराज चव्हाण पुढे म्हणाले, श्वेतपत्रिका म्हणजे चौकशी नाही. श्वेतपत्रिका याच्यासाठी की, अजित पवारांच्या २०१०-११ आर्थिक पाहणी अहवालात ७० हजार कोटी रुपये खर्च झाले आणि सिंचनाची टक्केवारी १८.० वरुन १८.१ झाली, हे अजित पवारांच्या नियोजन मंडळाच्या अहवालात नमूद केले होते. नव्याने मुख्यमंत्रीपदी आल्यानंतर मी ते पाहिले असता, मला धक्का बसला. त्यामुळे नेमकी वस्तूस्थिती सांगण्यासाठी एक अहवाल सादर करण्यास सिंचन खात्याला सांगितले. पुन्हा चुका होऊ नयेत हा त्या मागचा हेतू होता. चौकशी करायची असती तर अँटी करप्शनकडे दिली असती, असे चव्हाण सांगितले.

या प्रकरणाची खुली चौकशी व्हावी, असा खालून एक अहवाला आला. त्यामध्ये अँटी करप्शनकडून चौकशी करण्याचे आदेश द्यावे, असे त्या अहवालात म्हटले होते आणि तो गृहमंत्र्यांना सादर केला गेला. तत्कालीन गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी आपल्या स्तरावर ती मान्यता दिल्याचे मला आज अजित पवारांनी आज केलेल्या उल्लेखामुळे कळले, असे पृथ्वीराज चव्हाण म्हणाले.

ती फाईल माझ्याकडे आली नाही. त्यावर माझी सही नाही. त्यामुळे ७० हजार कोटींच्या सिंचन घोटाळयात मी चौकशी लावली नव्हती. माझा नाहक बळी घेतला. २०१४ ला अजित पवारांनी माझे सरकार पाडले. मी अजूनही ती फाईल बघितली नाही. ती फाईल गृहमंत्र्यांच्या स्तरावरुन मान्यता मिळून खाली गेली. त्यामुळे अजित पवार जे बोलले खरे आहे. मात्र, त्यात माझा काय दोष आहे, हे सांगितले असते बरे झाले असते. मी सिंचन प्रकरण, राज्य सहकारी बँकेचे प्रकरण असेल, मी राज्याच्या जनतेच्या हिताच्या निर्णय घेतले याची मला शिक्षा भोगली, पण मला त्याची चिंता नाही, असेही पृथ्वीराज चव्हाण म्हणाले.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ३० ऑक्टोबर २०२४


## या वयात इतके खोटे बोलायचे नसते - फडणवीस

**मुंबई :** दिवंगत उद्योगपती रतन टाटा महाराष्ट्रात उद्योग आणणार होते. पण भाजप आणि राज्य सरकारने हे उद्योग गुजरातमध्ये नेले, असा आरोप राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी आज बारामती येथे केला होता. शरद पवार यांच्या आरोपाला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोशल मीडियावरुन प्रत्युत्तर दिले आहे.

या वयात इतके खोटे बोलायचे नसते, अशी टीकाही देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. ज्यांच्या काळात गुंतवणूक आणण्यात कधी गुजरात तर कधी कर्नाटक नंबर १ वर होते, ते आज महाराष्ट्र क्रमांक १ वर आल्यावर जरा अधिकच अस्वस्थ झालेत, असा टोला फडणवीसांनी लगावला आहे.

टाटा एअरबस, फॉक्सकॉन असो, किंवा अन्य प्रकल्प सातत्याने खोटे बोलून मविआच्या नेत्यांनी दिशाभूल केली. सॅफ्रॅनच्या बाबतीत तर कहरच केला होता. कंपनीने २ मार्च २०२१ लाच हैदराबादेत त्यांच्या प्रकल्पाचे उद्घाटन केले होते. पण, आमचे सरकार आल्यावर तोही प्रकल्प गुजरातला गेल्याची आरोळी उठवली गेली, असेही फडणवीस यांनी म्हटले. देवेंद्र फडणवीस यांनी सोशल मीडियावर महाराष्ट्रात आलेल्या विविध प्रकल्पांविषयीच्या वृतांचे कात्रण आणि काही लिंक देखील शेअर केल्या आहेत.

या वयात इतके खोटे बोलायचे नसते... काल जयराम रमेशजी आणि आज शरद पवारजी, ज्यांच्या काळात गुंतवणूक आणण्यात कधी गुजरात तर कधी कर्नाटक नंबर १ वर होते, ते आज महाराष्ट्र क्रमांक १ वर आल्यावर जरा अधिकच अस्वस्थ झालेत. तरी सुद्धा खोटा नरेटिव्ह सेट होण्यापूर्वी वास्तव महाराष्ट्राला पुन्हा एकदा सांगावे लागेल.

# पवारांनी केली अजित पवारांची नक्कल



**बारामती :** विधानसभा मतदारसंघातील निवडणूक यावेळी चांगलीच चर्चेचा विषय ठरली आहे. अजित पवार विरुद्ध पुतण्या युगेंद्र पवार अशी लढत होत आहे. यात अजित पवार यांनी शरद पवार यांच्यावर आरोप केले होते. त्याला उत्तर देताना शरद पवार यांनी अजित पवार यांच्यावर जोरदार निशाणा साधला आहे.

इतकेच नाही तर अजित पवार यांची नक्कल करत शरद पवार यांनी डोळ्यावरील चष्मा काढला, तसेच डोळे देखील पुसले. त्यामुळे तेथे उपस्थित असलेल्या कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली.

युगेंद्र पवार हे पहिल्यांदाच निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. त्यांचा उमेदवारी अर्ज दाखल करायला शरद पवार स्वतः उपस्थित होते. त्यानंतर आज त्यांच्या प्रचारासाठी शरद पवार यांच्या सभेचे आयोजन देखील करण्यात आले होते. या सभेत शरद पवार यांनी अजित पवार यांच्यावर निशाणा साधला. लोकसभा निवडणुकीत सुनेत्रा पवार निवडणुकीला उभ्या होत्या. त्यावेळी शरद पवार येतील आणि भावनिक आवाहन करतील, असे त्यांनी म्हटले होते. मात्र आता ते भावनिक बोलत असल्याची टीका शरद पवार यांनी केली आहे. इतकेच नाही तर या वेळी बोलताना शरद पवार यांनी अजित पवार यांची नक्कल देखील केली.

काही लोकांनी आमच्यावर खटला केला. आयुष्यात ती कधीही कोर्टात उभा राहिलो नव्हतो. मात्र त्यांच्यामुळे मला त्याला सामोरे जावे लागले. माझ्या नावाने समन्स आले. मला घर फोडायला कोणीही शिकवले नसल्याचे देखील शरद पवार यांनी म्हटले आहे. बारामती विधानसभा मतदारसंघात होणारी पवार विरुद्ध पवार निवडणूक आता चांगलीच चर्चेचा विषय ठरली आहे. अजित पवार यांनी केलेल्या सर्व आरोपांना शरद पवार यांनी सडेतोड प्रत्युत्तर दिले आहे.

माझ्या आईने सांगितल्यानंतर देखील माझ्या विरोधात शरद पवार यांनी उमेदवार दिला असल्याचे अजित पवार यांनी म्हटले होते. लोकसभा निवडणुकीत जी चूक मी केली तीच चूक आता त्यांनी केले असल्याचे देखील अजित पवार यांनी म्हटले होते. या माध्यमातून अजित पवार यांनी शरद पवार यांच्यावर निशाणा साधला होता. आता त्याला शरद पवार यांनी देखील प्रत्युत्तर दिले आहे.




# आर. आर. पाटील यांनी केसाने गळा कापला : अजित पवार



**मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुन्हा एकदा धक्कादायक गौप्यस्फोट केला आहे. भाजपने आरोप केलेल्या सिंचन घोटाळ्याच्या चौकशीचे खापर त्यांनी तत्कालीन गृहमंत्री स्व. आर. आर. पाटील यांच्यावर फोडले आहे. त्यावेळी माझ्यावर सिंचन घोटाळ्याचे आरोप झाले. आणि चौकशीची करण्यासाठी फाईल तयार करण्यात आली. त्या फाईलवर आर. आर. आबांनी सही केली असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे. इतकेच नाही तर हा केसाने गळा कापण्यासारखा प्रकार असल्याचेही ते म्हणाले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आर. आर. पाटील यांच्याबाबत हा गौप्यस्फोट केला आहे. तासगावमध्ये आयोजित प्रचार सभेत ते बोलत होते. या वेळी अजित पवार म्हणाले की, माझ्यावर सिंचन घोटाळ्याचे आरोप झाले. मला बदनाम करण्याचा प्रयत्न झाला. मात्र त्या फाईलवर आर. आर. पाटलांनी सही केली असल्याचे अजित पवार यांनी म्हटल आहे. त्यांच्या या विधानामुळे आता महाराष्ट्रात नव्या वादाला तोंड फुटले आहे.

या वेळी अजित पवार म्हणाले की, इतक्या वर्षात केवळ बेचाळीस हजार कोटी रुपयांची कामे झाली होती. तरी माझ्यावर ७० हजार कोटींचा आरोप झाला. मात्र आकडा जेवढा मोठा आकडा, तितके लोक गंभीरतेने घेतात. म्हणून आकडा मोठा केला असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे. या आरोपांमुळे माझ्या चौकशीची फाईल तयार झाली. ती फाईल सही करण्यासाठी गृह विभागाकडे गेली. त्यावर आर. आर. पाटील यांनी सही देखील केली. त्या नंतर ही फाईल मुख्यमंत्र्यांकडे गेली. मात्र, पृथ्वीराज चव्हाण यांनी त्यावर सही केली नाही. त्याच वेळी आम्ही सरकारचा पाठिंबा काढला आणि सरकार पडून राष्ट्रपती राजवट लागू झाली. त्यानंतरच्या निवडणुकीत देवेंद्र फडणवीस यांचे सरकार आले. देवेंद्र फडणवीस यांनी त्यावर सही केली आणि मला बोलवून आर. आर. पाटील यांनी सही केल्याचे दाखवले, असे देखील अजित पवार यांनी म्हटले आहे.

आर. आर. पाटील यांनी या चौकशीच्या फाईलवर सही केली, हे मला कळल्यानंतर मला अत्यंत वाईट वाटले. आपला जिवाभावाचा सहकारी असून देखील त्यांनी तसे केले. आपले काहीतरी चुकले असेल, म्हणूनच त्यांनी अशी सही केली असेल. असे देखील अजित पवार यांनी म्हटले आहे. अजित पवार यांच्या या विधानामुळे आता राज्यातील राजकारण चांगलेच ढवळून निघाले आहे.

## निवडणुकीनंतर एकनाथ शिंदेंना कर्माची फळे भोगावी लागतील : संजय राऊत

**मुंबई :** वनगा कुटुंबाला भाजपने वाऱ्यावर सोडले असल्याचे उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे. वनगा यांना कर्माची फळे मिळाली आहेत. ती सर्वांनाच भोगावी लागतात. एकनाथ शिंदे यांना देखील ती भोगावी लागतील, अशी टीका संजय राऊत यांनी केली आहे.

निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर एकनाथ शिंदे यांना देखील त्यांच्या कर्माची फळे भोगावी लागणार असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. पालघर मतदारसंघातील आमदार श्रीनिवास वनगा हे नॉट रिचेबल झाले आहेत. यावर राऊत यांनी निशाणा साधला.

उद्धव ठाकरे हे देव माणूस आहेत. त्यासाठी कोणाच्या सर्टिफिकेटची आवश्यकता नाही. ते देव माणूस आहेतच, त्यामुळे तुम्हाला ते सांगण्याची आवश्यकता नसल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. वनगा यांच्याप्रमाणेच एकनाथ शिंदे यांना देखील त्यांच्या कर्माची फळे भोगावी लागणार असल्याचे राऊत यांनी म्हटले आहे.

वनगा हे पालघर विधानसभा मतदारसंघातील विद्यमान आमदार आहेत. मात्र विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वनगा यांना उमेदवारी न देता दुसरा उमेदवार दिला आहे. त्यामुळे वनगा नाराज आहेत. त्यामुळे त्यांच्या मनात सध्या आत्महत्या करण्याचा विचार येत असल्याचे त्यांच्या पत्नीने काल म्हटले होते. त्यातच वनगा हे काल संध्याकाळपासून नॉट रिचेबल आहेत. यावर आता संजय राऊत यांनी टीका केली आहे.

ठाकरे गटाचे उमेदवार डॉ. अद्वय हिरे यांच्यावर दादा भुसे यांच्या गुडांनी हल्ला केला, असा आरोप देखील संजय राऊत यांनी केला आहे. हिरे हे प्रचार करीत असताना त्यांच्यावर हल्ला करण्यात आला. हल्लेखोरांकडे तलवारी आणि गावठी पिस्तूल देखील होते, असाही आरोप राऊत यांनी केला आहे. हिरे यांना ठार मारण्याचा उद्देशानेच हा हल्ला होता, असा आरोप देखील राऊत यांनी केला आहे.

या हल्ल्यात आमचे पाच शिवसैनिक जखमी झाले आहेत. पोलिसांनी या संदर्भात ठोस कारवाई केलेली नसल्याचे राऊतांनी म्हटले आहे. त्यामुळे पोलिस यंत्रणेचा वापर करून अशा प्रकारे हल्ले होणार असतील, तर महाराष्ट्रामध्ये निवडणुका शांततेत करायच्या नाहीत. या राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांची निवडणुकीच्या आधी बदली करावी, अशी आमची मागणी यासाठीच होती, असे देखील राऊत यांनी म्हटले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ३० ऑक्टोबर २०२४

## ऐन निवडणुकीत ठाकरे गटाच्या ३ जिल्हाप्रमुखांची हकालपट्टी



**मुंबई :** ऐन विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असतानाच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून तीन पदाधिकाऱ्यांनी पदावरून डच्चू देण्यात आला आहे. यातील काहींनी पक्षाविरोधात भूमिका घेतली असल्याचे दिसून आले तर काही जण बंडखोरीच्या तयारीत आहेत.

छत्रपती संभाजीनगरचे जिल्हा प्रमुख किशनचंद तनवाणी, भोर आणि खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे जिल्हा प्रमुख शंकर हिरामण मांडेकर आणि महाड-श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघाचे जिल्हा प्रमुख अनिल नवगणे या तिघांची पक्षाच्या जिल्हा प्रमुख पदावरुन हकालपट्टी करण्यात आली आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून संभाजीनगर मध्य विधानसभा मतदारसंघातून किशनचंद तनवाणी यांनी उमेदवारी दिली होती. मात्र, तनवाणी ऐनवेळी निवडणुकीतून माघार घेतली. पक्षविरोधी भूमिका घेतल्यामुळे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने किशनचंद तनवाणी यांना जिल्हा प्रमुख पदावरुन कार्यमुक्त केले.

पक्षविरोधी भूमिका घेतल्याने ही कारवाई केली असून त्यांच्या जागी आता शहरप्रमुख बाळासाहेब थोरात यांना उमेदवारी देण्यात आली आहे, असे शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी नुकतेच एका पत्रकार परिषदेत सांगितले.

## नवाब मलिक राष्ट्रवादीचे अधिकृत उमेदवार



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते नवाब मलिक यांनी शिवाजीनगर मानखुर्द विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. या नंतर माध्यमांशी त्यांनी संवाद साधला. मला पक्षाकडून एबी फॉर्म मिळाला तर पक्षाकडून आणि नाही मिळाला तर अपक्ष म्हणून आपण निवडणूक लढवणार असल्याचे त्यांनी जाहीर केले होते. तसेच दुपारी ३ वाजेपर्यंत मला एबी फॉर्म मिळण्याची अपेक्षा असल्याचेही त्यांनी म्हटले होते. त्यांच्या अपेक्षेप्रमाणे त्यांना अखेरच्या क्षणी एबी फॉर्म मिळाला असून आता पक्षाचे अधिकृत उमेदवारी म्हणून ते निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत.

पक्षाकडून एबी फॉर्म मिळाला तर पक्षाकडून निवडणुकीला सामोरे जाईल. एबी फॉर्म मिळाला नाही तर अपक्ष म्हणून निवडणूक लढणारच असल्याचे नवाब मलिक यांनी म्हटले होते. संकटाच्या काळात अजित पवार माझ्या आणि माझ्या कुटुंबासोबत उभे होते. त्यामुळे मी त्यांच्यासोबत राहणार असल्याचे नवाब मलिक यांनी म्हटले होते. पक्षाकडून उमेदवारीची अपेक्षा असल्याचेही ते म्हणाले होते. त्यानुसार आता त्यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

नवा मलिक यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने एबी फॉर्म दिला असल्याची बातमी समोर आली होती. त्यानंतर नवाब मलिक यांनी उमेदवारी दाखल करण्यासाठी मोठे शक्तिप्रदर्शन देखील केले. मात्र तोपर्यंत त्यांनी पक्षाच्या वतीने एबी फॉर्म मिळाला असल्याच्या वत्ताला दुजोरा दिला नाही किंवा फेटाळला देखील नाही. मौन पाळत त्यांनी शक्तिप्रदर्शन केले तसेच उमेदवारी दाखल केली. उमेदवारी दाखल केल्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. तीन वाजेपर्यंत पक्षाचा एबी फॉर्म मला मिळेल, अशी मला अपेक्षा असल्याचे ते म्हणाले होते. अखेर त्यांना पक्षाने एबी फॉर्म दिला आहे.

या मतदारसंघात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वतीने देखील उमेदवार देण्यात आला आहे. मात्र माझ्या विरोधक कोण उमेदवार आहेत, कोण नाही? कोण कोणासोबत आहे? कोणता नेता आहे? हे मला माहित नाही. त्याची चिंता करण्याची आवश्यकता नाही. मी या मतदारसंघातून निवडणूक लढणार असून माझा विजय निश्चित असल्याचा दावा देखील नवाब मलिक यांनी केला आहे. जनतेच्या आग्रहाखातरच आपण निवडणुकीला सामोरे जात असल्याचे नवाब मलिक यांनी म्हटले आहे.

मी आणि माझी मुलगी सना मलिक दोघेही दोन वेगवेगळ्या विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढत आहेत. त्या देखील निवडून येतील असा दावा नवाब मलिक यांनी यावेळी केला. मला कोण विरोध करत आहे ते माहित नाही, असे म्हणत त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या विरोधाला प्रत्युत्तर दिले आहे. मी या निवडणुकीत जनतेच्या आग्रहाखातर उभा आहे. त्यामुळे मी विजयी होणारच असल्याचा दावा देखील त्यांनी केला.

## 'साधा शिक्षक ते अभिनेता - एक प्रवास' 'प्रविणकुमार अहिरेंचे चंदेरी दुनियेत पदार्पण'



**धुळे :** जिल्ह्यातील शिरुड हे गाव तसं कलाकांराची खाण आहे.शिरुडचे रहिवासी,सध्या कन्नड तालुक्यातील अतिदुर्गम भागातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा धामणी येथे कार्यरत,एक साधा पण धेयवेडा कलावंत शिक्षक, नाट्यकर्मी प्रविणकुमार छबीलाल अहिरे यांना 'मायाक्का फिल्म प्रोडक्शन' व 'मुंबई क्रिएशन इंटरटेन्मेंट' प्रस्तुत, बाळासाहेब एरंडे व मारुती बनकर निर्मित, राजकारणात अढळ स्थान प्राप्त करणारे आणि सांगोला मतदार संघातील ११ वेळा आमदार व कॅबिनेट मंत्री असलेले माननीय गणपतराव देशमुख यांच्या जीवनावरती येणारा बहुचर्चित चित्रपट कर्मयोगी आबासाहेब यात एक छोटीशी पण महत्वपूर्ण भूमिका करण्याची संधी मिळाली आहे.

वर्ल्ड बुक रेकॉर्ड प्राप्त दिग्दर्शक अल्ताफ दादासाहेब शेख यांनी दिग्दर्शन केले असून अभिनेते अनिकेत विश्वासराव, प्रदिप वेलणकर, विजय पाटकर, सुरेश विश्वकर्मा, हार्दीक जोशी, पृथ्वीक प्रताप, अरबाज शेख असे दिग्गज मराठी कलाकार मुख्य भूमिकेत आहेत. गाणी कुणाल गांजावाला यांच्या आवाजात तर अवधूत गुप्ते यांचे संगीत आहे.विशेष म्हणजे प्रदर्शनापूर्वीच या चित्रपटाला दोन आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

प्रविणकुमार अहिरेंनी यापुर्वीही मुंम्बा फिल्म फेस्टिव्हल पुरस्कार प्राप्त 'परसु आक्का' या फेस्टिव्हल फिल्ममध्ये किन्नरची भूमिका साकारली होती. 'रंग वेगळा प्रेमाचा' 'सावकार' 'कोरोना-एक संघर्ष' 'टम-टम' 'पेईंग गेस्ट बॉईज' या चित्रपटांसह 'चौफुली' 'दारुडा नवरा बायको बेजार' 'कथा कर्माची' 'तात्याची पोर जिवाला घोर' 'नाद खुळा' अशा वेबसिरिज मध्ये अहिरे यांनी अभिनयासह लेखन, दिग्दर्शन व निर्मितीही केली आहे.

लवकरच उसतोड कामगारांच्या जीवनावर आधारित "कोयताबंद' हा त्यांचा दिर्घ लघुचित्रपटही येणार आहे."कर्मयोगी आबासाहेब" हा मल्टीस्टारर चित्रपट मराठी आणि हिंदी भाषेत २५ ऑक्टोबर पासून संपूर्ण जगभर रिलीज झाला आहे.कलासक्त व आपला शिक्षकी पेशा सांभाळत दुर्गम भागातील एका खेडेगावात नोकरीस असूनही चित्रपट क्षेत्रात भरारी घेणाऱ्या सिने अभिनेता प्रविणकुमार अहिरेंचे कलेसह शिक्षण व सामाजिक क्षेत्रातून कौतुक व अभिनंदन होत आहे.

## महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून लखन भाऊ चव्हाण यांचा उमेदवारी अर्ज दाखल



**कन्नड (अक्षय चव्हाण) :** दि. २७ रोजी सन्माननीय राज साहेब ठाकरे यांनी कन्नड विधानसभा मतदार संघात लखन भाऊ चव्हाण यांना उमेदवारी जाहीर केली असता दि. २९ रोजी कन्नड सोयगांव १०५ , विधानसभा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अधिकृत उमेदवार लखन रोहिदास चव्हाण यांचा उमेदवारी अर्ज निवडणुक निर्णय अधिकारी कन्नड यांच्याकडे दाखल केला त्यावेळी मनसे पदाधिकारी जिल्हाउपाध्यक्ष डॉ बाबासाहेब थेटे, जिल्हासचिव गौतम शिरसाठ तालुका अध्यक्ष अनिल शेळके पाटील, सचिन चव्हाण आदी उपस्थित होते.

## रामदास पाटील अपक्ष निवडणूक लढवणार : भाजपच्या प्रदेश कार्यकारिणी निमंत्रित सदस्य पदाचा दिला राजीनामा

**हिंगोली :** विधानसभेत अपक्ष उमेदवारी दाखल केलेल्या भाजपाचे रामदास पाटील सुमठाणकर यांनी मंगळवारी ता. २९ पक्षाच्या प्रदेश कार्यकारीणीच्या निमंत्रीत सदस्य पदासह प्राथमिक सदस्यपदाचा राजिनामा पक्षाकडे पाठविला आहे. विधानसभेतून अपक्ष म्हणून निवडणुक लढविण्यावर आपण ठाम असल्याचे त्यांनी पत्रकारांशी बोलतांना स्पष्ट केले आहे.

हिंगोली सह नांदेड जिल्ह्यात पालिका मुख्याधिकारी म्हणून काम करतांना सुमठाणकर यांनी जनतेचे प्रश्न जवळून पाहिले. त्यानंतर त्यांनी मुख्याधिकारी पदाचा राजीनामा देऊन सक्रिय राजकारणात प्रवेश केला. भाजपामध्ये प्रवेश केल्यानंतर पक्षाने त्यांची दिव्यांग आघाडीच्या प्रदेश प्रकोष्ठपदी निवड केली होती. त्यानंतर हिंगोली लोकसभा प्रभारीपदाची जबाबदारीही त्यांच्यावर सोपवली होती. तर त्यानंतर त्यांना प्रदेश कार्यकारीणीवर निमंत्रीत सदस्य म्हणून घेण्यात आले होते.

दरम्यान, हिंगोली लोकसभा मतदार संघ पिंजून काढल्यानंतर त्यांनी पक्षाकडे उमेदवारी मागितली होती. त्यानंतर त्यांनी अपक्ष म्हणून त्यांनी उमेदवारी दाखल केली. मात्र उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री गिरीष महाजन, आमदार श्रीकांत भारतीय यांच्या मध्यस्थीनंतर उमेदवारी मागे घेतली होती. त्यानंतर त्यांनी हिंगोली विधानसभेची तयारी सुरु केली होती. हिंगोली विधानसभेच्या निवडणुकीत त्यांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यानंतर त्यांची भूमिका काय राहणार याकडे राजकिय वर्तुळाचे लक्ष लागले होते.

मात्र सुमठाणकर यांनी आज पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा तसेच प्रदेश कार्यकारीणी निमंत्रीत सदस्यपदाचा राजिनामा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे पाठविला आहे. आपण विधानसभा निवडणुकीत सुमारे २०० गावांत संपर्क केला असून जनता प्रस्थापितांना कंटाळल्यामुळे आपण अपक्ष म्हणून निवडणुक लढविण्यावर ठाम असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ३० ऑक्टोबर २०२४


# विद्यार्थ्यांनी मैदानी खेळांमध्ये निपुण व्हावे : कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते




**अमरावती** : खेळामुळे आत्मविश्वास, दृढता, शारीरिक चपळता, चंचलता असे मोठे गुण येतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मैदानी खेळांमध्ये निपुण व्हावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभाग व बडनेरा येथील आरडीआयके महाविद्यालय यांच्या संयुक्त सहकार्याने विद्यापीठातील क्रीडा मैदानावर नुकतेच तीन दिवसीय आंतर महाविद्यालयीन मैदानी स्पर्धेचे आयोजन केले होते. त्या वेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते बोलत होते.

स्पर्धेचे उद्घाटन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ सदस्य डॉ. सुभाष गावंडे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी आरडीआयकेचे प्राचार्य डॉ. राजेंद्र देशमुख, डॉ. अनिल बोंडे, डॉ. उमेश राठी, डॉ. आशिष महाजन उपस्थित होते.

कुलगुरू म्हणाले, खेळाचे जीवनातील महत्त्व, खेळ भावना, सहनशीलता, ताकद, चपळता हे गुण खेळाडूंसाठी महत्त्वाचे असल्याचे सांगून विद्यार्थ्यांनी खेळातील कौशल्य आत्मसात करावे, असे आवाहन देखील कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी खेळाडूंना केले. प्रमुख पाहुणे व उद्घाटक डॉ. सुभाष गावंडे म्हणाले, स्पर्धेच्या दृष्टीने खेळाडूंनी आपल्यात असलेल्या उणिवा शोधून त्या पूर्ण कराव्यात. जेणेकरून आपण अशा प्रकारच्या मैदानी स्पर्धांमध्ये विजयी होऊ शकेल.

स्पर्धेची सुरुवात प्रणाली शेगोकर, प्रियंका कुंडू, कुणाल चौधरी, वैभव गवई, पार्थ सावरकर, अनिकेत गवई, नितीन हिबरले, प्रियंका गुजर, रितेश ढोले, निशांत चौहान, प्रशांत चव्हाण या खेळाडूंनी मशाल घेऊन पाहुण्यांच्या हस्ते ज्योत प्रज्वलनाने झाली. प्रास्ताविकेतून विद्यापीठाच्या पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. तनुजा राऊत यांनी मैदानी स्पर्धेचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदेश रक्षे यांनी केले. समा लिवा यांनी खेळाडूंना प्रतिज्ञा दिली. आभार शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक डॉ. अतुल पाटील यांनी मानले. स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाला विद्यापीठाशी संलग्नित पाचही जिल्ह्यांमधील महाविद्यालयांचे शारीरिक शिक्षण व क्रीडा संचालक उपस्थित होते.

१३६ महाविद्यालयातील १११२ खेळाडूंचा सहभाग या मैदानी स्पर्धेत पाचही जिल्ह्यातील १३६ कॉलेजच्या १११२ स्पर्धकांनी भाग घेतला आहे. स्पर्धेकरिता डॉ. प्रशांत शिंगवेकर, विभागातील शिक्षक डॉ. हेमंतराज कावरे, डॉ. अतुल बिजवे, डॉ. विजय निमकर, सविता बावनथडे, सौरभ त्रिपाठी, नीलेश इंगोले, डॉ. सविता केणे, डॉ. पल्लवी चौधरी, एमपी एड. प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## प्रसिद्ध लेखिका वीणा देव यांचे निधन

लेखन, संकलन, संपादन असे साहित्य प्रकार लीलया हाताळून अभिवाचनाच्या माध्यमातून अभिजात साहित्याच्या प्रचारामध्ये योगदान देणाऱ्या ज्येष्ठ लेखिका आणि मराठीच्या विद्यार्थीप्रिय प्राध्यापिका डॉ. वीणा देव (वय ७५) यांचे अल्पशा आजाराने मंगळवारी निधन झाले. त्या ज्येष्ठ लेखक गो. नी. दांडेकर यांच्या कन्या होत. त्यांच्यामागे प्रसिद्ध अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांच्यासह दोन मुली, जावई आणि नातवंडे असा परिवार आहे. गेल्याच वर्षी त्यांचा अमृतमहोत्सव साजरा झाला होता. त्यांच्या जाण्यानं साहित्य क्षेत्रावर दु:खद छाया पसरली आहे.

गोनीदा यांच्यामुळे वीणा देव यांच्यावर घरातच मराठी भाषा आणि साहित्याचे संस्कार झाले. शाहू मंदिर महाविद्यालयात त्यांनी ३२ वर्षे अध्यापन कार्य केले. विभागप्रमुख म्हणून त्या सेवानिवृत्त झाल्या होत्या. ‘मराठी कथा-कादंबऱ्यांची नाट्यरूपे’ या विषयावर प्रबंध सादर करून त्यांनी पीएच. डी. संपादन केली होती.

## सौ. संजना ताई जाधव यांचा उमेदवारी अर्ज दाखल



**कन्नड (अक्षय चव्हाण)** : कन्नड-सोयगाव विधानसभा मतदारसंघातून मायबाप जनतेच्या आशीर्वादाने शिवसेना व महायुतीची अधिकृत उमेदवार म्हणून कन्नड सोयगाव विधानसभा मतदारसंघाच्या संघर्षकन्या सौ. संजनाताई जाधव यांनी नामांकन अर्ज दाखल केला. यावेळी मोठ्या संख्येने महायुतीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व मायबाप जनता मोठ्या संख्येने उपस्थित होती.कन्नडच्या जनतेने माझ्यावर जो विश्वास दाखवला त्या विश्वासाचे हे फळ आहे. येणाऱ्या निवडणुकीत जनतेच्या आशीर्वादाने निश्चितच माझा विजय होईल अशी भावना याप्रसंगी ताईंनी व्यक्त केली.






## काँग्रेसने उमेदवारी देऊनही अखेरपर्यंत एबी फॉर्मच दिला नाही : दिलीप माने



**सोलापूर** : दक्षिण विधानसभा मतदारसंघात मोठा ट्विस्ट पहायला मिळाला. काँग्रेसने माजी आमदार दिलीप माने यांना उमेदवारी जाहीर केली असतानाही त्यांनी आज अपक्ष उमेदवारी अर्ज भरला. यामागे काँग्रेसकडून शेवटपर्यंत उमेदवारी अर्ज दिला गेला नसल्याचे कारण समोर आले आहे. आज उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस होता. पण काँग्रेसकडून उमेदवारी जाहीर करुनही आज अखेरपर्यंत एबी फॉर्म न भेटल्याने आपण अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केल्याचे दिलीप माने यांनी सांगितले.

दिलीप माने यांनी अपक्ष उमेदवारी नामांकन दाखल केल्यानंतर माध्यमांशी संवाद साधला. काँग्रेसच्या उमेदवारांच्या यादीत माझे नाव होते. मात्र, उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी पक्षाकडून शेवटच्या क्षणापर्यंत एबी फॉर्म उपलब्ध झाला नाही, असा दावा त्यांनी केला. वरिष्ठांशी बोलले असता आज सकाळपर्यंत फॉर्म मिळेल, असे सांगण्यात आले. मात्र, एबी फॉर्म काही मिळाला नाही.

काहीतरी गोंधळ सुरू असल्याचे लक्षात आल्याने मी अपक्ष अर्ज भरला आहे. ज्यांनी तिकीट जाहीर केले, त्यांचीच एबी फॉर्म आणून द्यायची जबाबदारी होती. परंतु, एबी फॉर्म देण्यात सगळेच कमी पडले. कार्यकर्त्यांसोबत चर्चा करुन ४ तारखेपर्यंत निर्णय घेणार असल्याचेही दिलीप माने यांनी सांगितले.

सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघ काँग्रेसचा हक्काचा मतदारसंघ आहे., मात्र, ती जागा मित्रांना सोडली. ही सगळी मॅच फिक्सिंग आहे. जिथे काँग्रेस उमेदवाराला संधी न देता मित्रपक्षाला जागा सोडली, तिथे कुणीही विश्वास ठेवू नका. इथे प्रत्येक पण आपली बाजू सुरक्षित करण्याचा प्रयत्न करत आहे. आपली मुलगी, पत्नी कशी निवडून येईल, यासाठी सर्व काही सुरू असल्याचा आरोप दिलीप माने यांनी केला.

दरम्यान, सोलापूर दक्षिण मतदारसंघातून काँग्रेसने दिलीप माने यांनी उमेदवारी जाहीर केली होती. तर याच मतदारसंघातून ठाकरे गटाने अमर पाटील यांना उमेदवारी जाहीर करत एबी फॉर्म सुद्धा दिला होता. महाविकास आघाडीच्या दोन्ही पक्षांकडून एकाच जागेवर दोघांना उमेदवारी दिल्याने या मतदारसंघात काँग्रेस विरुद्ध ठाकरे गट असा वाद सुरू होता. दिलीप माने आणि अमर पाटील दोघांनाही आपापल्या पक्षांकडून उमेदवारी मिळाल्याने दोघांमध्ये मैत्रीपूर्ण लढत होण्याची शक्यता होती. मात्र, काँग्रेसने दिलीप माने यांना अखेरपर्यंत एबी फॉर्म न देता महाविकास आघाडीचा धर्म पाळल्याची चर्चा रंगली आहे.